21 MAY 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पक्षभेद विसरून दहशतवादाविरोधात लढले पाहिजे

## निष्णात कायदेतज्ज्ञ ॲड. उज्ज्वल निकम : डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

**अमेरिकेवर ११/९ चा हल्ला झाला. त्यानंतर अमेरिकेने दहशतवाद्यांचा शोध घेतला. त्याचा म्होरक्या ओसामा बिन लादेन याला शोधून काढले. पाकिस्तानात घुसून त्याचा खात्मा केला. त्यावर अमेरिकेच्या सत्ताधारी, विरोधक आणि प्रसारमाध्यमे साऱ्यांनीच पूरक बाजू घेतली. नेमके याविरोधातील चित्र आपल्याकडे दिसते. दहशतवादाविरोधात मतभेद विसरून सर्व पक्षांनी एकदिलाने लढा दिला पाहिजे, असे निष्णात कायदेतज्ज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांनी शनिवारी सांगितले.**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पुढारी'कार कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत 'भारत आणि दहशतवाद' या विषयावर ॲड. निकम बोलत होते. व्यासपीठावर दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. ॲड. निकम यांच्या व्याख्यानासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह नागरिक, विद्यार्थ्यांच्या झालेल्या गर्दीने शाहू स्मारक भवन खचाखच भरून गेले होते.

जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मौलाना अझहर मसूद याने पुलवामा जिल्ह्यातील अवंतीपुरा येथे जम्मूहून श्रीनगरकडे निघालेल्या केंद्रीय राखीव दलाच्या जवानांच्या बसवर हल्ला केला. आदिल नावाच्या एका व्यक्तीने ३५० किलो आरडीएक्सने भरलेली कार या बसवर आदळली. या स्फोटात बसमधील सर्व ४२ जवान शहीद झाले. यानंतर भारताने २६ फेब्रुवारी २०१९ रोजी सर्जिकल स्ट्राईक केला. पाकिस्तानमध्ये १२ विमानांतून घुसून ६०० दहशतवाद्यांना ठार केले. काश्मीरमधील ३५० दहशतवादी ठार केले. मात्र, पुलवामा हल्ल्याबाबत आपण कल्पना दिली होती, असे मलिक यांनी म्हटले; पण हे केव्हा, जेव्हा ते राज्यपालपदावरून, सर्व अधिकार, लाभ भोगून निवृत्त झाल्यानंतर. त्यांनी हे त्याचवेळी का सांगितले नाही, सांगितले होते तर ते रेकॉर्डवर का घेतले नाही, असा सवाल करत

पान ४ वर




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत बोलताना निष्णात कायदेपंडित ॲड. उज्ज्वल निकम. डावीकडून दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)

### दाखवला शिवरायांचा गनिमी कावा

अजमल कसाबचा खटला सुरू असताना, राखी पौर्णिमेदिवशी आपल्या हातातील राखी बघून कसाबने डोळ्यांना बोटे लावली. त्यावर बहिणीच्या आठवणीने तो भावनिक झाला, रडला, असे वृत्त बाहेर गेले. त्यातून त्याला सहानुभूती मिळण्याची शक्यता होती. मात्र, सायंकाळी आपण न्यायालयाबाहेर आलो. प्रसारमाध्यमांनी त्याबाबत विचारता, कसाबने बिर्याणी मागितली होती, असे सांगताच सर्व चित्रच बदलले. हा दाखवलेला कात्रजचा घाट होता. अशाप्रकारे अनेकदा शिवरायांचा गनिमी कावा या खटल्यात वापरला आणि देशवासीयांना न्याय देता आला, असेही निकम यांनी सांगितले.

21 MAY 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पक्षभेद विसरून दहशतवादाविरोधात लढले पाहिजे

(पान १ वरून) तेदेखील त्याला तितकेच जबाबदार ठरू शकतात, असेही निकम यांनी सांगितले.

भारतातील दहशतवादामागे पाकिस्तानच आहे आणि पाकिस्तानचे लष्कर दहशतवाद नियंत्रित करत असून, त्याला चीन अभय देत असल्याचे स्पष्ट करत २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या खटल्यातून पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर आणल्याचे ॲड. निकम म्हणाले.

भारतात १९९० ते २००१ च्या काळात झालेले दहशतवादी हल्ल्याचे नियोजन लाहोरमध्ये तत्कालीन राष्ट्रपती आणि लष्कराच्या मदतीने रचले गेले. तिथेच दहशतवाद्यांना प्रशिक्षित करून जम्मू-काश्मीरमध्ये पाठवले जात होते. यानंतर कराची प्लॅन आला. तो पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा 'आयएसआय'पुरस्कृत होता. 'आयएसआय'ने धोरण बदलत, भारतातील तरुणांना जिहादी बनवले. सोशल माध्यमांद्वारे त्यांची माथी भडकवली, या भडकलेल्या डोक्यांचा फायदा घेतला, त्याचे उत्तम उदाहरण म्हणून इंडियन मुजाहिद्दीनकडे पाहावे लागेल. १९९२ ला पाडलेल्या बाबरी मशिदीचा बदला म्हणून १९९३ चा मुंबई बॉम्बस्फोट केला. त्यात अनेक निष्पाप लोक मारले गेले. यावेळी भारतातील टायगर मेननने दुबईत जाऊन कुख्यात गुंड दाऊदची भेट घेतली आणि हा दहशतवादी कारवायांचा प्लॅन केला होता. २००३ साली गेट वे ऑफ इंडिया आणि झवेरी बाजारात झालेल्या हल्ल्यानंतर पुन्हा स्वरूप बदलले आणि पाकिस्तानातच प्रशिक्षण देऊन दहा दहशतवाद्यांना भारतात पाठवून दिले. पाकिस्तानचा हा चेहरा, जगासमोर आणला आणि जगाला ते पटवून दिल्याचेही ॲड. निकम यांनी सांगितले.

दहशतवाद म्हणजे छुपे युद्धच असते, असे सांगत ॲड. निकम म्हणाले, मुंबईच्या २६/११ च्या हल्ल्यामागे पाकिस्तानच आहे, पाकिस्ताननेच हे दहशतवादी घडवले, तिथेच हा कट शिजला हे शिष्टमंडळासमवेत पाकिस्तानमध्ये जाऊन ठणकावून या दहशतवादी कृत्याबाबत या दहशतवादामागचा म्होरक्या लष्कर-ए-तोयबाचा हाफीज सईद याच्यावर काय कारवाई केली, अशी विचारणा आपण केली. त्यावर त्यांनी पुरावे मागितले. दरम्यान, अमेरिकेच्या शिकागो न्यायालयाने ३५ वर्षांची शिक्षा सुनावलेल्या डेव्हिड हेडलीला भारतात माफीचा साक्षीदार केले. त्याची व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सलग सात दिवस साक्ष घेतली. त्यात एक दिवस हेडली कॅमेऱ्यासमोर आला नाही, त्यावेळी चतुराई दाखवली आणि अमेरिकन गुप्तचर यंत्रणेला स्वतंत्र सॅटेलाईटची व्यवस्था करावी लागली, त्यातून हेडलीची घेतलेली साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. त्यातून भारतातील दहशतवादामागील खरा चेहरा समोर आला. अजमल कसाब याने न्यायालयात आपली बाजू मांडताना अल्पवयीन असल्याचे सांगत बचावाचा प्रयत्न केला, त्यावरून हे दहशतवादी किती प्रशिक्षित आहेत, हे स्पष्ट करत पकडले गेल्यानंतर तपास यंत्रणेला कसे गोंधळून टाकायचे, याचेही प्रशिक्षण देणारे लष्कर-ए-तोयबाचे मॅन्युअलच न्यायालयात वाचून दाखवले. या खटल्यात अजमल कसाबने भावनिक मुद्दे उपस्थित करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला; पण कसाबला फासावर लटकवलेच. कसाबला फाशी झाली यापेक्षाही दहशतवादामागे पाकिस्तान आहे हे जगासमोर आणता आले, हे या खटल्याचे वैशिष्ट्य ठरले, असेही निकम यांनी सांगितले.

पाकिस्तानमधील जनता ही सर्वसामान्य आहे, त्यांना भारतातील घडामोडी जाणून घ्यायच्या असतात, यामध्ये काही झाले तरी त्यांना काळजी असते. मात्र, पाकिस्तान लष्कराला राजवट नियंत्रणाखाली ठेवायची असते, त्यासाठी दहशतवादालाही पाकिस्तानचे लष्करच नियंत्रित करत आहे, असे सांगत सौदी अरेबिया, चीन आणि अमेरिका हे देश पाकिस्तानला दहशतवादाच्या निर्मूलनासाठी सहकार्य करत आहेत. अमेरिकन काँग्रेसने लष्करी सहकार्याचा ठरावही केला आहे. मात्र, हे सर्व अफगाणिस्तानच्या सीमेवरील दहशतवादासाठी होत आहे. भारतातील दहशतवादाबाबत हे देश बोलत नाहीत. यामुळे भारतालाही आता विशिष्ट राजनैतिक धोरण हाती घ्यावे लागेल, असेही त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित 'पुढारी'कार कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत निष्णात कायदेपंडित ॲड. उज्ज्वल निकम यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी शाहू स्मारक भवन गर्दीने तुडुंब भरले होते. (छाया : पप्पू अत्तार)

**धार्मिक वाद टाळा**

केवळ कठोर कायदा करून दहशतवादाला आळा बसणार नाही. कायदा जेवढा कठोर कराल तितके त्याचे दुष्परिणामच अधिक असतात. तसेच कायदा कठोर करून चालणार नाही, तर त्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणाही सक्षम असायला हवी, असे सांगत दहशतवाद रोखण्यासाठी कोण खरा हिंदू, कोण खरा नमाजी, माझा धर्म मोठा की तुझा धर्म मोठा, अशा धार्मिक श्रेष्ठत्वाची कल्पना डोक्यातून काढून टाका, सर्वच राजकीय आणि सामाजिक जीवनातील नेतृत्वांनी धार्मिक टिपणीपासून दूर राहावे, असे आवाहन करत धार्मिक वाद होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. ग. गो. जाधव अध्यासन हे देशातील पत्रकारितेचे पहिले अध्यासन आहे. या माध्यमातून डिजिटल युगातील पत्रकार निर्माण करण्यासाठी निश्चित उपयोग होणार असल्याचे सांगितले.

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. विश्वराज जोशी यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

## डॉ. ग. गो. जाधव सिद्धहस्त संपादक

राजर्षी शाहू महाराज यांनी पावन केलेल्या या भूमीत स्वातंत्र्यपूर्व काळात सातवीपर्यंत शिक्षण घेतले असताना शिक्षणाची आस घेऊन डॉ. ग. गो. जाधव मुंबईला गेले. आयुष्यात शिक्षणाचे महत्त्व असतेच; पण सुसंस्कृत होण्यासाठी विचारांची जोड लागते. डॉ. ग. गो. जाधव यांना मामा वरेरकर, प्रबोधनकार ठाकरे, घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही सहवास लाभला. अशा थोर लोकांच्या सहवासातून त्यांनी घेतलेल्या विचाराने ते सिद्धहस्त संपादक झाले.

## धार्मिक विद्वेष दहशतवादाला खतपाणी घालतो

धर्माचा अभिमान घरापुरताच ठेवा, तो चव्हाट्यावर आणू नका, त्याचे प्रदर्शन करू नका; अन्यथा कायद्याचा अभ्यासक म्हणून आपणालाही कडवे दहशतवादी म्हणावे लागेल, असे रोखठोक मत मांडत ॲड. निकम म्हणाले, दहशतवादाची नेमकी व्याख्या नाही. मात्र, मानवी मूल्ये पायदळी तुडवून काही व्यक्ती विकृत, विध्वंसक कृतीने समाजात भीतीचे वातावरण पसरवतात, त्याला दहशतवाद म्हणता येईल. सरकार अंतर्गत आणीबाणी आणून सर्वसामान्यांचे स्वातंत्र्याचे हक्क पायदळी तुडवतात, तो शासनपुरस्कृत दहशतवाद असतो. आपलाच वंश श्रेष्ठ आहे, असे काहींना वाटते, त्यासाठी ते कोणत्याही थराला जातात तेव्हा वंश श्रेष्ठवादी दहशतवाद असतो आणि प्रत्येकाला आमचाच धर्म श्रेष्ठ आहे आणि ते दाखवण्यासाठी विध्वंसक कृती केली जाते. तेव्हा तो धार्मिक श्रेष्ठवादी दहशतवाद असतो. सध्या तो वाढत चालला आहे. त्यातून धार्मिक विध्वंस आणि त्यातून आर्थिक विध्वंस हे साध्य दहशतवादाला साधक करून केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष

21 MAY 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# धार्मिक टीका बंद केल्यास दहशतवादास आळा

## डॉ. उज्ज्वल निकम : विद्यापीठातर्फे शाहू स्मारकमध्ये व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : परदेशातील दहशतवादी संघटना आपल्या देशात येऊन तरुणांची माथी भडकवत असल्याने दहशतवादाला खतपाणी मिळत आहे. त्यामुळे देशातील सर्वच राजकीय पक्षांनी, त्यांच्या प्रमुखांनी धार्मिकतेवर टिप्पणी करण्यास बंदी घातली, तर देशांतर्गत होणार दहशतवाद संपेल, असा आशावाद ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. डॉ. उज्ज्वल निकम यांनी शनिवारी (दि.२०) व्यक्त केला.



कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनमध्ये शनिवारी शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग.गो. अध्यासनाच्या वतीने 'भारत आणि दहशतवाद' या विषयावर डॉ.उज्ज्वल निकम यांचे व्याख्यान झाले. यावेळी डॉ. प्रतापसिंह जाधव, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील व डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

येथील शाहू स्मारक भवनमध्ये शिवाजी विद्यापीठातील डॉ. ग.गो. अध्यासनाच्या वतीने 'भारत आणि दहशतवाद' या विषयावरील ३६ व्या स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. डॉ.निकम यांनी १९९० पासून ते २६/११ पर्यंत झालेले दहशतवादी हल्ले व त्यातून दहशतवाद्यांनी घेतलेला कायद्याचा आधार, शिक्षा यांचा प्रवास ओघवत्या शैलीत मांडला. कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर पुढारीचे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे उपस्थित होते.

डॉ. निकम म्हणाले, आपल्या देशात तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, हीच आपली शक्ती आहे. मात्र, पाकिस्तानातील दहशतवादी संघटना विविध प्रकारे आपल्या देशातील तरुणांची माथी भडकवत आहेत. यातून देशात वारंवार धार्मिक ध्रुवीकरण होत आहे. हे टाळायचे असेल तर राजकीय नेत्यांनी धार्मिक टिप्पणी करणे बंद करावे. आरोप-प्रत्यारोप करताना वापरली जाणारी भाषाही दंगलीस कारणीभूत ठरत आहे. १९९० ते २००१ या काळात पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान जिया उल हक यांनी लाहोर पॅटर्नद्वारे दहशतवादी कारवायांना खतपाणी घातले. कराची पॅटर्नने भारतातील तरुणांची माथी भडकवली. मुंबईतील दहशतवादी हल्ला प्रकरणात पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर आणला याचे समाधान आहे.

डॉ.डी.टी.शिर्के यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. व्ही.एन.शिंदे यांनी आभार मानले. विश्वराज जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
21 MAY 2023
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील क्रांतिवन परिसराच्या सुशोभीकरणास प्रारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या क्रांतिवन परिसराचे सुशोभीकरण क्रांतिदिनापर्यंत पूर्ण करावे, अशी सूचना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली.

क्रांतिवन परिसराच्या सुशोभीकरणाच्या कामास शुक्रवारी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, क्रांतिवनामध्ये आता पेव्हिंग ब्लॉक बसविलेला वॉकिंग ट्रॅक बनविण्यात येणार आहे. मार्गावर ठिकठिकाणी बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे. लॉन निर्मिती, जलसाठे, सौरदिवे, बाजूने बोगणवेलीचे कुंपण अशी आखणी केली आहे. उद्यानामध्ये सोनचाफा, कांचन, जांभूळ आदी झाडांची रोपे लावण्यात येणार आहेत.

उद्यान आकर्षक करण्याच्या दृष्टीने विविध प्रकारची फुलझाडे वगैरे लावण्यात येतील. सध्या



कोल्हापूर : विद्यापीठाच्या क्रांतिवन परिसराच्या सुशोभीकरण कामास प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

शहिदांचे स्मृतिफलक एकत्रित उभे केले आहेत. ते उद्यानामध्ये ठिकठिकाणी नव्याने उभारण्यात येतील. त्यांच्या नावांवर २४ तास प्रकाशझोत राहील, याची सौरदिव्यांच्या साहाय्याने व्यवस्था करण्यात येईल. विद्यापीठ फिरण्यास येणाऱ्या प्रत्येक ज्येष्ठ नागरिकास प्रसन्न वाटावे, विद्यार्थ्यांच्याही मनात शहिदांप्रती कृतज्ञभाव निर्माण व्हावा, या दृष्टीने परिसराचे सुशोभीकरण करण्याचा मानस प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केला.

यावेळी डॉ. कैलास सोनवणे, डॉ. गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, महेश साळुंखे, सहायक कुलसचिव अमित कांबळे, एस. जे. पाटील, जी. बी. मस्ती, उद्यान अधीक्षक अभिजित जाधव, एस. एस. साळुंखे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 MAY 2023

लोकमत


डॉ. माया पंडित : 'अंडर द लेन्स : फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' पुस्तकाचे प्रकाशन

# सिनेसाक्षरता वाढविण्यासाठीही प्रयत्न गरजेचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** चित्रपटांचा कलेच्या पलीकडे जाऊन विविधांगांनी संशोधकीय अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सिनेसाक्षरता वाढविण्यासाठीही प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन प्रा. माया पंडित यांनी केले. त्या 'अंडर द लेन्स : फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होत्या.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातर्फे शुक्रवारी 'अंडर द लेन्स : फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. हे पुस्तक इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी आणि डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी संकलित व संपादित केले आहे. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी 'अंडर द लेन्स : फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. माया पंडित यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. चंद्रकांत लंगरे, चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी उपस्थित होत्या.

प्रा. माया पंडित म्हणाल्या, कोल्हापूरने भारतीय सिनेमाच्या जडणघडणीतील योगदान महत्त्वपूर्ण आहे, याचे विस्मरण होऊ नये. कोल्हापुरात सिनेमा आणि संस्कृती व लिंगभावना या महत्त्वाच्या विषयावर झालेल्या परिषदेतील चर्चेचे पुस्तकरूपाने प्रकाशन होते याचा सार्थ अभिमान वाटतो. चित्रपटांकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन विकसित होण्यासाठी शिक्षणामध्ये सिनेमाला स्थान देण्याची गरज आहे.

चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया यांनी चित्रपटांचा समाजव्यवस्थेवर होणारा परिणाम विषद केला. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, हिंदी, मराठी, इंग्रजी, कन्नड तसेच इटालियन सिनेमाच्या विवेचनामुळे हे पुस्तक बहुसांस्कृतिक झाले आहे.

डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी परिचय करून दिला. प्रा. तृप्ती करेकट्टी यांनी पुस्तकाचा आशय सांगितला. मेघा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, अधिसभा सदस्य मिठारी, डॉ. पारिजात, डॉ. डी. एन. पाटील, डॉ. अरुंधती पवार, डॉ. श्रुती जोशी यांच्यासह इंग्रजी विभागातील शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

21 MAY 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चॅट जीपीटी मार्केटिंगसाठी वरदान

## डॉ. राजेंद्र पारिजात; शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मार्केटिंग यंत्रणा गतिशील बनवण्यासाठी आधुनिक काळात चॅट जीपीटीचा उपयोग वरदान ठरत आहे. चॅट जीपीटी मार्केटिंग क्षेत्रात क्रांती घडवून आणत आहे, असे प्रतिपादन सायबर कॉलेजचे प्रा. डॉ. राजेंद्र पारिजात यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. राजेंद्र पारिजात.**

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम व मास कम्युनिकेशन विभागात आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. डॉ. पारिजात म्हणाले, पारंपरिक पद्धतीने घरोघरी जाऊन, दुकानातून, मॉलमधून तसेच प्रदर्शनातून वस्तू-सेवांची विक्री केली जाते. आजच्या माहितीतंत्रज्ञानाच्या युगात अनेक ऑनलाईन प्लॅटफॉर्म्स उपलब्ध आहेत. ग्राहक ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सवरून खरेदी करत असतो. खरेदी करण्यापूर्वी ग्राहक वस्तुसंबंधित शुल्क, गुणवत्ता, मिळण्याचे ठिकाण, उपभोक्त्याच्या प्रतिक्रिया याबाबत माहिती चॅट जीपीटीच्या माध्यमातून मिळण्यास मदत होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी परशराम पवार, डॉ. चंद्रशेखर वानखेडे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी



कोल्हापूर : पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांना आदरांजली वाहताना मान्यवर.


# डॉ. ग. गो. जाधव यांना आदरांजली

**कोल्हापूर :** पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांना शिवाजी विद्यापीठात आदरांजली वाहण्यात आली. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, पत्रकारिता विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, अभियांत्रिकी विभागाचे उपकुलसचिव रणजित यादव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# चित्रपटांचा संशोधकीय अभ्यास होणे आवश्यक

## प्रा. माया पंडित : 'अंडर द लेन्स : फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' पुस्तकाचे प्रकाशन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'अंडर द लेन्स : फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

चित्रपटांचा कलेच्या पलीकडे जाऊन विविधांगांनी संशोधकीय अभ्यास होणे, त्याचप्रमाणे सिने साक्षरता वाढवण्यासाठीही प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन प्रा. माया पंडित यांनी केले.

त्या 'अंडर द लेन्स : फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात बोलत होत्या.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातर्फे 'अंडर द लोन्सा : फिल्म्सं, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा झाला. हे पुस्तक इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी आणि डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी संयुक्तरीत्या संकलित व संपादित केले आहे.


अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, हिंदी, मराठी, इंग्रजी, कन्नड, तसेच इटालियन सिनेमांच्या विवेचनामुळे हे पुस्तक बहुसांस्कृतिक झाले आहे.

कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. डी. एन. पाटील, डॉ. अरुंधती पवार, डॉ. श्रुती जोशी, डॉ. चंद्रकांत लंगरे, प्रा. तृप्ती करेकट्टी, मेघा कांबळे, सुप्रिया पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
21 MAY 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सिनेसाक्षरता वाढविण्याची गरज

## प्रा. डॉ. माया पंडित : 'अंडर द लेन्स : फिल्म्स..'चे प्रकाशन




**शिवाजी विद्यापीठात 'अंडर द लेन्स : फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील. सोबत (डावीकडून) डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. माया पंडित, डॉ. तृप्ती करेकट्टी.**

कोल्हापूर, ता. २० : 'चित्रपटांचा कलेच्या पलीकडे जाऊन विविधांगांनी संशोधकीय अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सिनेसाक्षरता वाढविण्यासाठीही प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे', असे प्रतिपादन प्रा. माया पंडित यांनी केले. त्या 'अंडर द लेन्स: फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात त्या बोलत होत्या.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातर्फे शुक्रवारी 'अंडर द लेन्स: फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा झाला. हे पुस्तक इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी आणि डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी संयुक्तरित्या संकलित व संपादित केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.

प्रा. माया पंडित म्हणाल्या, 'कोल्हापूरने भारतीय सिनेमाच्या जडणघडणीत दिलेले योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. याचे विसमरण होऊ देता कामा नये. कोल्हापुरात 'सिनेमा आणि संस्कृती व लिंगभावना' या अतिशय महत्त्वाच्या विषयावर परिषद होते आणि त्यातील चर्चेचे पुस्तकरुपाने प्रकाशन होते आहे. याचा सार्थ अभिमान वाटतो. 'चित्रपटांकडे पाहण्याचा निकोप दृष्टि कोन विकसित होण्यासाठी शिक्षणामध्ये सिनेमाला स्थान देण्याची गरज त्यांनी यावेळी अधोरेखित केली.'

चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया यांनी चित्रपटांचा समाजव्यवस्थेवर होणारा परिणाम याविषयी विवेचन केले. समर नखाते यांचा पुस्तकातील लेख सिनेमाचे बदलते स्वरूप आणि सामाजिक वास्तव समजावून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'हिंदी, मराठी, इंग्रजी, कन्नड तसेच इटालियन सिनेमाच्या विवेचनामुळे हे पुस्तक बहुसांस्कृतिक झाले आहे.' या सर्वच सांस्कृतिक परिस्थितीमध्ये स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन मात्र फारसा वेगळा नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. करेकट्टी यांनी पुस्तकाचा आशय व प्रकाशनामागील उद्देश स्पष्ट केला.

मेघा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. डी. एन. पाटील, डॉ. अरुंधती पवार, डॉ. श्रुती जोशी यांच्यासह इंग्रजी विभागातील शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

21 MAY 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


तरुण भारत

# क्रांतिवन परिसराचे सुशोभीकरण क्रांतिदिनापर्यंत पूर्ण करा

## कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रशासनास सूचना

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या क्रमांक आठ प्रवेशद्वारासमोरील भागात क्रांतीवन परिसर आहे. या ठिकाणी हुतात्मा स्मारक तसेच कोल्हापूर, सांगली व सातारा आणि सोलापूर (सन २००३ पर्यंत) जिल्ह्यांमधील हुतात्म्यांचे स्मृतीफलक आहेत. या क्रांतीवन परिसराच्या सुशोभीकरणाच्या कामास शुक्रवारी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : सुशोभीकरणाचे उद्घाटन करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

क्रांतीवनामध्ये आता पेव्हिंग ब्लॉक बसविलेला वॉकिंग ट्रॅक बनविण्यात येणार आहे. मार्गावर ठिकठिकाणी बैठक व्यवस्था करण्यात येणार असून ठिकठिकाणी लॉन निर्मिती, जलसाठे, सौरदिवे, बाजूने बोगणवेलीचे कुंपण अशी आखणी करण्यात आली आहे. उद्यानामध्ये आधीपासूनच चाफा, आवळा, वड, चिंत, शिरीष अशी झाडे आहेत. त्यामध्ये प्रजातींसह सोनचाफा, कांचन, जांभूळ आदी झाडांची रोपे लावण्यात येणार आहेत. उद्यान अधिकाधिक आकर्षक करण्याच्या दृष्टीने विविध प्रकारची फुलझाडे वगैरे लावण्यात येतील. सध्या हुतात्म्यांचे स्मृती फलक एकत्रित उभे केले आहेत. ते उद्यानामध्ये ठिकठिकाणी नव्याने उभारण्यात येतील. त्यांच्या नावांवर २४ तास प्रकाशझोत राहील, याची सौरदिव्यांच्या साहाय्याने व्यवस्था करण्यात येईल. येथे फिरावयास येणाऱ्या प्रत्येक ज्येष्ठ नागरिकास प्रसन्न वाटावे आणि विद्यार्थ्यांच्याही मनात शहीदांप्रती कृतज्ञभाव निर्माण व्हावा, या दृष्टीने या परिसराचे सुशोभीकरण करण्याचा मानस असल्याचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी डॉ. कैलास सोनवणे, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, महेश साळुंखे, साहाय्यक कुलसचिव अमित कांबळे, एस. जे. पाटील, जी. बी. मस्ती, उद्यान अधीक्षक अभिजीत जाधव, एस. एस. साळुंखे आदी उपस्थित होते.

### कुसुमाग्रज यांच्या सूचनेनुसार क्रांतीवन

कोल्हापूरच्या जनतेच्यावतीने ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांना राजर्षी छत्रपती शाहू पुरस्कार प्रदान करण्याचा कार्यक्रम नाशिक येथे झाला. त्यावेळी शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. द. ना. धनागरे उपस्थित होते. याप्रसंगी कुसुमाग्रजांनी प्रत्येक विद्यापीठामध्ये हुतात्म्यांची नावे असणारे एक स्मृतीस्थळ विकसित करण्याची सूचना केली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात स्वातंत्र्यसैनिकांच्या तसेच युद्धात हुतात्मा झालेल्या भागातील सैनिकांच्या स्मृती जागृत राहतील, अशी त्यांची भावना होती. त्यांच्या सूचनेनुसार सन २००० मध्ये शिवाजी विद्यापीठात क्रांतीवनाची निर्मिती करण्यात आली. कुसुमाग्रजांची 'अनाम वीरा...' या कवितेचा फलक स्मृतीस्थळी उभारण्यात आला आहे.

तरूण भारत

# लोकांमध्ये सिनेसाक्षरता वाढवण्याची आवश्यकता

- ईएफएल विद्यापीठाच्या माजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : चित्रपटांचा कलेच्या पलिकडे जाऊन विविधांगांनी संशोधकीय अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सिनेसाक्षरता वाढविण्यासाठीही प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन ईएफएल विद्यापीठाच्या माजी प्र–कुलगुरू डॉ. माया पंडित यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातर्फे 'अंडर द लेन्स: फिल्म्स, जेंडर अँड कल्चर' या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात त्या बोलत होत्या. हे पुस्तक इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी आणि डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी संयुक्तरित्या संकलित व संपादित केले आहे. चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.

यावेळी चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडीया यांनी मार्गदर्शन केले. समर नकाते यांचा पुस्तकातील लेख सिनेमाचे बदलते स्वरूप आणि सामाजिक वास्तव समजावून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी स्वागत केले. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी पुस्तकाचा आशय उद्देश सांगितला. मेघा कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

तरूण भारत

# समाजशास्त्राचे जीवनगौरव पुरस्कार जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेने यंदा सहाजणांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर केले आहेत. त्यात ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि समाजशास्त्र डॉ. रमेश जाधव, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. एन. डी. जत्राटकर, प्रा. सरिता माने, प्रा. सुकुमार अकोळे, प्राचार्य व्ही. व्ही. भोसले यांचा समावेश आहे. या पुरस्काराचे वितरण सोमवार २२ मे रोजी सकाळी १० वाजता शहाजी महाविद्यालयात डॉ. एस. एन. पवार यांच्या हस्ते होणार आहे. समाज आणि समाजशास्त्र परिषदेने गेल्या वर्षापासून प्राध्यापकांना जीवनगौरव पुरस्कार देण्यास सुरुवात केली आहे. यंदा परिषदेच्या १४ व्या अधिवेशनामध्ये सहा प्राध्यापकांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला आहे, अशी माहिती डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी दिली. अधिवेशनाचे उद्घाटन प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी यांचे बीजभाषण असणार आहे. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शहाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांनी केले आहे.